आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२८ डिसेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सरकारी इतमामाने अंत्यसंस्कार
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि भूतान नरेश  यांच्यासह अनेक मान्यवरांची श्रद्धांजली
- भारतातल्या अमेरिकन दूतावासाने सलग दुसऱ्या वर्षी दहा लाखांहून अधिक स्थलांतरेतर व्हिसा जारी करुन नोंदवला विक्रम
- बॉर्डर - गावस्कर चषक मालिकेतल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, भारताच्या नितेश रेड्डीचं पहिलं कसोटी शतक

**आणि**

- उत्तर भारतात थंडीची लाट कायम, महाराष्ट्रात पावसाची शक्यता

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री आणि जागतिक ख्यातीचे अर्थतज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांना आज शोकाकुल वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. दिल्लीच्या निगम बोध  घाटावर आज त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शीख धर्मीय संस्कारांनुसार त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला,  भूतान नरेश जिगमे खेसर नामग्येल वांगचुक यांच्या सह अनेक केंद्रीय मंत्री तसेच विरोधी पक्षनेते राहुल

गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी यांच्यासह अनेक नेते, उच्च पदस्थ अधिकारी, काँग्रेस कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

सकाळी दहा वाजता त्यांची अंत्ययात्रा काँग्रेस कार्यालयातून निघाली. फुलांनी सजवलेल्या सैन्यदलाच्या ट्रकवर त्यांचं पार्थिव ठेवण्यात आले होते. हजारोंच्या संख्येने सर्वसामान्य नागरिकही या अंत्ययात्रेत उत्स्फूर्तपणे सामील झाले होते. पावणे बाराच्या सुमारास त्यांचे पार्थिव दिल्लीच्या निगम बोध घाटावर आणण्यात आलं. यावेळी केंद्रीय मंत्री, प्रधानमंत्री, उपराष्ट्रपती आणि भूतान नरेश यांनी  त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुष्पचक्र अर्पण केल्यानंतर सैन्यदलाच्या वतीनं शोकधून वाजवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांना गार्ड ऑफ ऑनर म्हणजेच मानवंदना देण्यात आली. ....

**बाईट- धून.....**

मनमोहन सिंग यांच्या शवपेटीवरील तिरंगा त्यांच्या कुटुंबियांकडे प्रदान करण्यात आला. त्यानतर त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी चंदनाच्या

चितेवर नेण्यात आलं. यावेळी शीख धर्मातल्या प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर त्यांना हवेत बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. डॉ. मनमोहन सिंह अमर रहे च्या घोषणांनी यावेळी परिसर दुमदुमून गेला होता.

डॉ. मनमोहन सिंह यांचं गुरुवारी रात्री दिल्लीच्या रुग्णालयात वृद्धापकाळानं निधन झालं. काल त्यांचं पार्थिव त्यांच्या निवासस्थानी आणि आज काँग्रेस कार्यालयात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं.

डॉ. मनमोहन सिंह यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजूजू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. मनमोहन सिंह यांच्या निधनाबद्दल जगातल्या अनेक देशांनी आपले शोकसंदेश पाठवले आहेत.

केंद्रसरकारने ७ दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरवण्यात आला आहे.

**<><><><><>**

डॉ मनमोहन सिंग यांचं यथोचित स्मारक बांधण्यासाठी सरकार जागा देऊ करणार असल्याचं केंद्रीय गृह मंत्रालयानं म्हटलं आहे. स्मारकासाठी जागा देण्याची विनंती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल सरकारकडे केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर लगेचच गृहमंत्री अमित शहा यांनी सिंग यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना ही माहिती दिली.

डॉ. मनमोहन सिंह यांचं स्मारक उभारलं जाईल असा निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला असून काँग्रेस पक्षाला ही माहिती देण्यात आली आहे, असं भाजप खासदार आणि प्रवक्ता सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितलं. देशात आर्थिक विकासाचा पाया घालणारे माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांचा

योग्य तो सन्मान राखण्यासाठी भाजप आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार वचनबद्ध आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र नोदी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून उद्या देशो देशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 117 वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, न्युजऑनएआयआर  ॲप तसंच एअर न्यूज, दूरदर्शन आणि प्रधानमंत्री कार्यालयाच्या युट्युब वाहिनीवरुन हा कार्यक्रम थेट प्रसारित केला जाईल.

<><><><><>

नेपाळमधे सालझंडी इथं होणाऱ्या सूर्यकिरण या संयुक्त लष्करी सरावासाठी भारतीय सेनेची तुकडी रवाना झाली आहे. या सरावाची ही १८वी फेरी असून भारताच्या तुकडीत ३३४ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या महिनाअखेरीपासून येत्या १३ जानेवारीपर्यंत हा सराव चालेल. घनदाट जंगलांमधे सशस्त्र अतिरेक्यांच्या कारवाया थोपवण्यासाठी तसंच नैसर्गिक आपत्ती काळात दुर्गम भागात मदत पोहोचवण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण या सरावात दिलं जाणार आहे. त्याखेरीज जलद कारवाईसाठीची तयारी, हवाई मार्गाने हलचाली, वैद्यकीय प्रशिक्षण आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीनेही या सरावादरम्यान भर देण्यात येणार आहे. भारत – नेपाळ दरम्यान मैत्री संबंध दृढ करण्याच्या प्रयत्नांचा हा भाग असल्याचं संरक्षण दलांच्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

भारतातल्या अमेरिकन दूतावास आणि वाणिज्य दूतावासाने सलग दुसऱ्या वर्षी दहा लाखांहून अधिक स्थलांतरेतर व्हिसा जारी करून एक नवीन विक्रम नोंदवला आहे. अमेरिकनं जारी केलेल्या निवेदनात, गेल्या चार वर्षात भारतातून अमेरिकेत येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत पाच पटीनं वाढ झाल्याचं म्हटलं आहे. या वर्षाच्या पहिल्या अकरा महिन्यात 20 लाखाहून अधिक भारतीयांनी अमेरिकेची वारी केली असल्याचंही दूतावासानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मेलबर्न इथं सुरू असलेल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, तिसऱ्या दिवसअखेर भारतानं आपल्या पहिल्या डावात, ९ बाद ३५८ धावा केल्या आहेत. पहिल्या डावात भारत अजूनही ११६ धावांनी पिछाडीवर आहे.

सामन्याच्या आज तिसऱ्या दिवशी भारतानं कालच्या ५ बाद १६४ धावसख्येवरुन आपला पहिला डाव पुढे सुरू केला. मात्र काल नाबाद असलेले ऋषभ पंत २८ तर रविंद्र जडेजा १७ धावा करून बाद झाले. त्यानंतर नितेश रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी आठव्या गड्यासाठी १२७ धावांची भागिदारी करत, भारताला फॉलोऑनच्या संकटातून बाहेर काढलं.  नितेश रेड्डी यानं आंतरराष्ट्रीय कसोटी कारकिर्दीतलं पहिलं शतक झळकावलं. वॉशिंग्टन सुंदर ५० धावांवर आणि त्यापाठोपाठ जसब्रीत बुमराह शून्यावर बाद झाला.

तिसऱ्या सत्रात आधी अपुऱ्या प्रकाशामुळे आणि त्यानंतर पाऊस पडू लागल्यानं उरलेला खेळ होऊ शकला नाही. दिवसअखेर नितेश रेड्डी १०५ तर मोहम्मद सीराज २ धावा करून खेळपट्टीवर टिकून होते.

<><><><><>

किंग्ज कप आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खुल्या स्पर्धेच्या आज होणाऱ्या उपांत्य फेरीत लक्ष्य सेनची लढत चीनच्या हू झेन अॅन याच्याशी होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी पाच वाजता सुरू होईल.

दरम्यान, काल झालेल्या उपांत्य पूर्व सामन्यात लक्ष्यने हाँगकाँगच्या अन्गुस ना का लोंग याचा १०-२१, २१-१३,२१-१३ असा पराभव केला होता.

<><><><><>

भारतीय हॉकी संघाच्या साखळी सामन्यांना ओडिशामध्ये आज सुरुवात होणार आहे. आरंभिक सामन्यांमध्ये आज दिल्ली एसजी पायपर्सचा सामना गोनासिका संघाशी होईल. या स्पर्धा दोन टप्प्यात होणार आहे. साखळी फेरीतला अंतिम सामना येत्या १ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात थंडीची लाट अद्याप कायम आहे. जम्मूकाश्मिरमध्ये थंडीचा कडाका वाढला असून, काल विविध भागात बर्फवृष्टी झाली. श्रीनगर जम्मू राष्ट्रीय महामार्गावरील दोन्ही बाजूंची वाहातूक बर्फवृष्टी आणि निसरडया रस्त्यांमुळे बंद ठेवण्यात आली होती. दक्षिण काश्मिरच्या शोपिया

जिल्ह्यातही मोठ्याप्रमाणात बर्फवृष्टी झाल्यानं मुगल रस्त्य वाहतूकीसाठी बंद करण्यात आला होता. तर श्रीनगर तसंच राज्यातल्या विविध पर्यटनस्थळांवर पर्यटक बर्फवृष्टीचा आनंद लुटताना दिसताहेत. मात्र वाहतूक विभागानं पर्यटकांना प्रवास करण्यापुर्वी रस्ते आणि महामार्गांच्या स्थिती जाणून घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. बर्फवृष्टीमुळे काश्मीर विद्यापीठाच्या आज होणाऱ्या सर्व परीक्षाही पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

हिमाचल प्रदेशातही डोंगराळ भागात हिमवृष्टी आणि सखल भागात पावसानं हजेरी लावली आहे. यामुळं जनजीवन विस्कळीत झालं असून मुख्य महामार्गांवर बर्फ साचल्यानं वाहतुकीला अडथळा निर्माण झाला आहे. राजधानी शिमला सहित किन्नौर, लाहौल स्फिती परिसरात अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला आहे. रस्त्यांवर बर्फ साचल्यानं अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. पर्यटकांनी सावधगिरी बाळगावी आणि स्थानिक प्रशासनानं दिलेल्या सूचनांचं पालन करावं असं वाहन करण्यात आलं आहे.

उत्तराखंडामध्येही अनेक ठिकाणी हिमवृष्टी झाली असून जनजीवन प्रभावित झालं आहे.

//<><><><><>//